# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.03.2026** **वार:गुरुवार**

1. संघर्षग्रस्त पश्चिम आशियात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांचा परतीचा ओघ सुरु
2. बेकायदा सावकारी करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा मुख्यमंत्र्यांचा इशारा
3. राज्यात उस गाळप आणि साखर उत्पादन दोन्हींमध्ये वाढ आणि
4. टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत न्यूझीलंड अंतिम फेरीत दाखल, आज भारत-इंग्लंड उपांत्य सामना

**<u>पश्चिम आशिया</u>**

संघर्षग्रस्त पश्चिम आशियात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांचा परतीचा ओघ सुरु आहे. दुबईत अडकलेले पुणे जिल्ह्यातील 184 पैकी 111 नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले आहेत. तसंच 19 नागरिकांच्या विमान उड्डाणाची वेळ बदलण्यात आली असून 54 नागरिकांना परत आणण्याची प्रक्रिया सुरु आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

कोल्हापूर जिल्ह्यातील 23 नागरिक कोल्हापूरमध्ये पोहोचले आहेत. 80 नागरिक उद्या दुबईहून कोल्हापूरला पोहोचणार आहेत. लातूर जिल्ह्यातील 23 नागरिक आखाती देशांमध्ये अडकून पडले आहेत.

संघर्षग्रस्त भागात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना सुखरूप मायदेशी आणलं जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत दिलं. पश्चिम आशियामध्ये अडकलेल्या भारतीयांना परत आणण्याचं काम केंद्र सरकार करत असून राज्य सरकार सातत्यानं पाठपुरावा करत आहे असं ते म्हणाले. देशात सुमारे दोन महिन्यांचा तेलसाठा उपलब्ध असल्यानं तातडीनं इंधन दरवाढीची भीती नसल्याचं ते म्हणाले.

पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर बीड, रत्नागिरी, सोलापूरसह राज्यात विविध ठिकाणी इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा पसरवली जात आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये, असं आवाहन संबंधित जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

**<u>विधानसभा-निर्णय</u>**

रिझर्व बँकेनं ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त व्याजदर लावणाऱ्या किंवा इतर नियमांचं उल्लंघन करणाऱ्या संस्था किंवा सावकारांचे परवाने रद्द केले जातील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. काँग्रेसचे भाई जगताप आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांनी विचारलेल्या प्रश्नांला उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले...

**अवैध सावकाराचे तर सगळे दिलेले कर्ज आहेत ते अवैधच आहेत. त्यामुळे त्या संदर्भात कोणाला प्रताडित केलं जात असेल तर त्यांनी तक्रार करावी आम्ही तक्रार घेऊ आणि त्या सावकारावर कारवाई करू. जो लायसन्स्ड सावकारी करतो आहे त्यांनीही नियमापेक्षा जास्त जर वसुली केली असेल किंवा जो काही आपला व्याजाचा दर ठरलेला आहे, दाम दुपटीचे जे काही नियम या सगळ्या नियमांच्या विपरीत जाऊन जर कुठल्या लायसेन्स सावकाराने अशा पद्धतीने कोणावर कर्ज लादलं असेल त्यांनी ही तक्रार करावी आम्ही कारवाई करून नियमानुसार त्यांना पूर्ण रिलीफ देऊ आणि अशा प्रकारे**

**चुकीचं काम कोणी करत असेल तर त्यांचा सावकारीचा लायसन्स देखील रद्द होईल आणि फौजदारी कारवाई देखील त्या ठिकाणी करण्यात येईल.**

**<u>करार</u>**

पुणे आणि रायगड जिल्ह्यांत 2100 मेगावॅट क्षमतेचा पिंपळपाडा-सावळे उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसित करण्यासाठी चॅम्बेरी पॉवर या कंपनीसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पासाठी 10 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक प्रस्तावित आहे. ऊर्जा साठवण आणि स्थिर वीजपुरवठा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीनं हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

**<u>साखर</u>**

राज्यातील साखर कारखान्यांचा ऊस गळीत हंगाम अंतिम टप्प्यात आला आहे. साखर आयुक्तालयाच्या ताज्या अहवालानुसार, राज्यात आतापर्यंत 10 कोटी टन ऊस गाळप झालं असून 9 पूर्णांक 41 टक्के उताऱ्यानुसार 94 लाख मेट्रिक टन साखर उत्पादन झालं आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा 148 लाख मेट्रिक टनांनी ऊस गाळप आणि 13 लाख मेट्रिक टनांनी साखर उत्पादन वाढलं आहे अशी माहिती साखर आयुक्त डॉक्टर संजय कोलते यांनी दिली. वाढीव गाळप क्षमता आणि ऊस तोडणी यंत्रांच्या वाढत्या वापरामुळं कारखान्यांनी वेगानं गाळप पूर्ण केलं.

**<u>थकबाकी</u>**

वर्तमान गळीत हंगामात उस उत्पादक शेतकऱ्यांना 5 हजार कोटी रुपये थकबाकी देय असल्यानं यावर शासनानं तातडीनं ठोस उपाय करावेत, अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे. कारखान्यांना कमी व्याज दरानं कर्ज द्यावं, उसाच्या किमान विक्री किंमतीत वाढ करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, साखर निर्यातीसाठी अनुदान द्यावं आणि इथेनॉलच्या दरवाढीसाठीही तातडीनं निर्णय घ्यावा, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

**<u>राज्यसभा</u>**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी महाराष्ट्रातल्या जागांकरिता भारतीय जनता पक्षानं 4 उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपा नेते विनोद तावडे, यांच्या खेरीज नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात आलेले रामराव वडकुते या दोन नवीन चेहऱ्यांचा त्यात समावेश आहे.

महाविकास आघाडीकडून ज्येष्ठ नेते शरद पवार यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे.

**<u>शिवनेरी</u>**

मुंबई-पुणे मार्गावर लोकप्रिय ठरलेली महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'शिवनेरी' बससेवा आता राज्यभर विस्तारली जाणार आहे. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही घोषणा केली. नाशिक-पुणे, पुणे-कोल्हापूर, पुणे-सोलापूर, नागपूर-चंद्रपूर यांसह अनेक मार्गांवर ही सेवा सुरू होणार आहे.

**<u>तुकाराम बीज</u>**

संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याला आज पहाटेपासून देहू नगरीमध्ये सुरुवात झाली आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून भाविक देहूमध्ये दाखल झाले आहेत. संत तुकाराम महाराज संस्थान आणि देहू नगरपंचायतीनं भाविकांसाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या असून परिसरात चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**वृक्ष तोड**

रस्ते आणि इमारतींच्या बांधकामासाठी मोठे वृक्ष तोडले जातात. त्यांची पुन्हा व्यवस्था करण्याच्या उद्देशानं बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव इथल्या डॉक्टर गायत्री आणि डॉक्टर कालिदास थानवी या दांपत्यानं मिशन ओटू हा उपक्रम राबवला आहे. यात नवीन वृक्ष लावण्याबरोबरच जुन्या वृक्षांचं जतन आणि संवर्धन केलं जातं. जनुना तलाव परिसरात खामगाव नगर परिषदेनं दिलेल्या जागेवर त्यांनी ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली आहे. या उपक्रमाबद्दल बोलताना डॉक्टर कालिदास थानवी म्हणाले...

**सहा ते सात वर्षापासून प्लांटेशनचं आम्ही काम करतो आहे त्याच्यात आम्ही ग्रिनॅथॉन म्हणून एक नवीन कन्सेप्ट आणलेला आहे. मॅरेथॉनमध्ये आपण फिटनेससाठी धावतोच पण ग्रिनॅथॉनमध्ये असा कन्सेप्ट आहे, की आम्ही रन करून तिथे दोन ते तीन हजार झाडं लावतोय. तर यासाठी आम्ही इथं सहा ते सात हजार झाडं लावलेली आहेत. आम्हाला नगरपालिकेची शेळके साहेबांची खूप मदत झाली. इथं फेन्सिंग आणि प्लांट्स अवेलेबल करून भेटले, तर आमची सेवा चालू असताना आम्हाला एक फोन आला की आता तहसील कोड नवीन बनत आहे, तिथं काही झाडं आहेत ते झाडं त्यांना कट करायची परमिशन होती. शेळके साहेबांनी हंड्रेड पर्सेंट मदत दिली आम्हाला तर आम्ही हा पिंपळाचा सत्तर वर्ष जुना एक झाड आणि तिथं औदुंबर आहे. आतापर्यंत आम्ही चार ते पाच झाडं शिफ्ट केलेले आहेत आणि सगळ्यांना पानं आलेले आहेत तर सगळ्यांना सांगायची इच्छा आहे की आता रोड वायडनिंगसाठी जे झाडं कट होत आहे तर आपण एक चान्स घेऊ शकतो कदाचित हा थोडा टफ टास्क आहे पण आपली जे इमोशनल अटॅचमेंट असते झाडांसाठी तर त्याला आपण प्रयत्न करून वाचवू शकतो.**

**किरणोत्सव-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ल्याची ग्रामदेवता देवी सातेरी मंदिरात काल सकाळी सव्वासात वाजता किरणोत्सव पाहायला मिळाला. यावेळी मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित होते. वर्षातून दोन वेळा हा किरणोत्सवाचा योग येतो. हा सोहळा पुढील दोन दिवस चालणार आहे.

**क्रिकेट**

टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत न्यूझीलंडनं काल कोलकाता इथं दक्षिण आफ्रिकेवर 9 गडी राखून विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या 8 बाद 169 धावा झाल्या. न्यूझीलंडनं केवळ एक गडी गमावून तेराव्या षटकातचं हे लक्ष्य गाठलं. फिन ऍलेननं नाबाद शंभर धावा फटकावल्या. स्पर्धेचा दुसरा उपांत्य सामना आज भारत आणि इंग्लंड दरम्यान मुंबईत वानखेडे मैदानावर संध्याकाळी सात वाजल्यापासून सुरु होणार आहे.

**हवामान**

मराठवाडा आणि विदर्भात आज हवामान कोरडं राहील तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.